# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६००/२६३३३३३०/२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in


## बँक (IBPS) रेल्वे, एल.आय.सी. इ. व तत्सम स्पर्धा परीक्षेच्या नि:शुल्क पूर्व प्रशिक्षणाकरीता महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या युवक-युवतीना बँक (IBPS) रेल्वे, एल.आय.सी. इ. व तत्सम स्पर्धा परीक्षांच्या पूर्व तयारी करीता खालील नमूद महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या तसेच विविध शासकीय/ निमशासकीय प्रशिक्षण केंद्रांच्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

| अनु. क्र. | प्रशिक्षण केंद्राचे नाव | एकूण जागा |
|---|---|---|
| १ | नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे | १०० |
| २ | येरवडा संकुल, बार्टी, पुणे | १०० |
| ३ | सामाजिक न्याय भवन , औरंगाबाद | ५० |
| ४ | सामाजिक न्याय भवन, बार्टी उपकेंद्र, नागपूर | ५० |
| ५ | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, महाड, रायगड | १२० |
| ६ | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ५० |
| ७ | गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | ७५ |
| ८ | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ ,जळगाव | ७५ |
| ९ | श्रीमती नाथाबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई (महिलांसाठी) | ७५ |
| १० | श्रीमती नाथाबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, पुणे (महिलांसाठी) | ७५ |
| | **एकूण** | **७७०** |
| | | |

**पात्रता :**

१) महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२) उमेदवाराकडे महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचा दाखला व अधिवास असावा.
३) बँक (IBPS) रेल्वे, एल.आय.सी. इ. व तत्सम स्पर्धा परीक्षांच्या पूर्व तयारी प्रशिक्षणासाठी उमेदवार पदवी उत्तीर्ण असावा.
४) रु. ८ लाखापर्यंत उत्पन्न मर्यादा असलेला उमेदवार प्रशिक्षणासाठी पात्र असतील.

**आरक्षण :**

- ३० % जागा महिलांसाठी राखीव (अनु. ९ व १० मधील प्रशिक्षण केंद्र वगळून)
- ४ %जागा "दिव्यांग" असलेल्या व्यक्तींसाठी (Person with Disability)
- ५ % जागा अनुसूचित जाती अंतर्गत वंचित जाती मधील (वाल्मिकी व तत्सम जाती-होलार, बेरड, मातंग, मांग, मादगी, ई.) करीता
- एकूण जागांच्या ५% जागा विशेष बाब म्हणून राखीव ठेवण्यात येईल.

**चाळणी परीक्षेचे स्वरूप :**

- बँक (IBPS) रेल्वे, एल.आय.सी. इ. व तत्सम स्पर्धा परीक्षांच्या धर्तीवर विद्यार्थी निवडी करीता चाळणी परीक्षा घेण्यात येईल.
- चाळणी परीक्षेची तारीख https://barti.in/ या बार्टी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती :**

- **ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम दिनांक १०/०९/२०२३**
- प्रशिक्षण कालावधी -६ महिने

- निवड झालेल्या पात्र विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दरम्यान ७५ टक्के पेक्षा जास्त कालावधी प्रशिक्षणास उपस्थित राहिल्यास विद्यावेतन अदा केले जाईल. वसतीगृहामध्ये प्रवेश मिळाल्यास दरमहा रु.४०००/- एवढे विद्यावेतन अदा करण्यात येईल. तसेच ज्यांना वसतिगृहामध्ये प्रवेश उपलब्ध होणार नाही त्यांना विद्यावेतन दरमहा रु. ६०००/- अदा केले जाईल.
- सदर योजनेबाबत/ प्रशिक्षणाबाबत काही वाद अथवा धोरणात्मक पेच/प्रसंग निर्माण झाल्यास याबाबतचे अंतिम सर्व अधिकार मा. महासंचालक, बार्टी व शासनास राहतील.
- उपरोक्त जाहिरातीतील नमूद केलेल्या प्रशिक्षणार्थी संख्या कमी जास्त करण्याचे अधिकार मा. महासंचालक यांना राहतील.
- प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणतीही शासकीय/निमशासकीय खाजगी नोकरी अथवा व्यवसाय करता येणार नाही.
- ज्या उमेदवरांनी यापूर्वी बार्टी, पुणे मार्फत (MPSC) महाराष्ट्र लोकसेवा आयोग-राज्यसेवा स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, UPSC नागरी सेवा स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण आणि बँक (IBPS) रेल्वे, एल.आय.सी. इ. व तत्सम स्पर्धा परीक्षांचे यापूर्वी प्रशिक्षण घेतले असेल त्यांची पुन्हा नव्याने प्रशिक्षणासाठी निवड केली जाणार नाही.

❖ **इच्छुक व पात्र उमेदवारांनी दिनांक ३१/०८/२०२३ पासून https://barti.live/barti/ibps/login या लिंकवरुन ऑनलाईन अर्ज सादर करावा.**

❖ टीप - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, महाड, रायगड येथे प्रशिक्षणास **इच्छुक व पात्र असलेल्या उमेदवारांनी https://barti.in या संकेतस्थळावरून Notice Board या सदराखालील "महाड करीता बँक (IBPS) रेल्वे, एल.आय.सी. इ. व तत्सम स्पर्धा परीक्षांच्या पूर्व तयारी करीता अर्ज" या लिंकवरून अर्ज डाऊनलोड करून "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, शिवाजी चौक, काटेश्वरी तळे, महाड जिल्हा रायगड-४०२३०१" या पत्यावर विहित मुदतीत खालील नमूद कागदपत्रांसह अर्ज सादर करावा.**

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :**

- उमेदवाराचा प्रशिक्षणाकरीताचा अर्ज
- उमेदवाराचा पासपोर्ट आकाराचा फोटो
- शाळा सोडल्याच्या दाखल्याची छायांकित प्रत
- पदवी उत्तीर्ण प्रमाणपत्राची छायांकित प्रत
- जातीच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत
- उमेदवाराच्या आधारकार्डची छायांकित प्रत
- दिव्यांग असल्यास ४०% पेक्षा जास्त प्रमाणात असलेल्या दिव्यांगत्वाच्या दाखल्याची छायांकित प्रत
- उमेदवाराचे सद्यस्थितीत सुरु असलेल्या बँक खात्याच्या पास बुकच्या पहिल्या पृष्ठाची छायांकित प्रत

(सर्व छायांकित प्रती उमेदवाराने साक्षांकित करणे आवश्यक आहे.)

**महासंचालक,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**